# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यातील पंचायत राज संस्थांच्या लोकप्रतिनिधींच्या निवडणूकीसाठी शिक्षणाची अट लागू करण्याबाबत

**(१) ६३२२ (०८-०४-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजस्थान शासनाने पंचायत राज्य संस्थांच्या निवडणूकीत उमेदवारांसाठी किमान शिक्षणाची अट माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान लागू केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील पंचायत राज संस्थांच्या निवडणूकीत किमान शिक्षणाची अट लोकप्रतिनिधींसाठी लागू करावी अशी मागणी नागरिकांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील पंचायत राज संस्थांच्या निवडणूकीत लोकप्रतिनिधींसाठी किमान १० वी पास शिक्षणाची अट लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२४-०५-२०१७) :**(१) होय.

राज्यस्थान शासनाच्या संकेत स्थळावरुन प्राप्त माहितीनुसार समजते.

(२) होय.

(३) सदर प्रस्ताव यापूर्वी मंत्रीमंडळास सादर करण्यात आला असता तो मंत्री मंडळात मंजूर होऊ शकला नाही. सदर प्रस्ताव यथावकाश मंत्रीमंडळाला सादर करावा असे तत्कालीन मंत्रीमंडळाचे निदेश होते. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

### अमरावती जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या समुपदेशन केंद्राबाबत

**(२) १६९६३ (१४-०८-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुटुंबातील मारहाण, लैंगिक छळ व इतर समस्यांनी ग्रस्त तसेच मानसिकदृष्टया असंतुलित महिलांच्या सामाजिक, मानसशास्त्रीय व कायदेशीर समुपदेशनासाठी अमरावती जि.प.च्या महिला व बालकल्याण विभागाच्यावतीने तालुकास्तरावर स्वंयसेवी संस्थाद्वारा समुपदेशन केंद्र सुरु करण्यात आले असून जिल्ह्यात ८ तालुक्यात ही केंद्रे सुरु असून या केंद्राची सध्याची अवस्था व निवाडे झालेली प्रकरणे पाहता वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उदासिनतेमुळे ही केंद्र कागोदपत्रीच असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणामुळे अशा प्रकारच्या महिलांना सहाय्य मिळत नसल्याने त्याची गैरसोय होत असल्याने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२४-०५-२०१७) :**(१) नाही.

अमरावती जिल्ह्यामध्ये एकंदरीत ५ समुपदेशन केंद्र कार्यरत आहेत व त्यांना प्रत्येकी २५,०००/- प्रमाणे लाभ दिला जात आहे.

(२) अमरावती जिल्ह्यातील ५ समुपदेशन केंद्राची राज्य महिला आयोगाकडून तपासणी करण्यात येते. त्यासाठी जिल्हा समन्वयकाची नेमणुक केलेली आहे. प्रत्येक समुपदेशन केंद्रामध्ये दर तिमाहीला सभा घेऊन संबंधित संस्था चालकांना योग्य ते मार्गदर्शन करुन योग्य त्या सूचना देण्यात येत आहेत. तसेच प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी महिला व बालकल्याण विभागाने संरक्षण अधिकारी (क.) यांच्याकडून पिडीत महिलांना न्याय दिला जातो. त्यामुळे पिडीत महिलेची गैरसोय होत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमरावती जिल्ह्यात दारिद्र्रेषेच्या यादीमध्ये फेरफार करण्यात आल्याबाबत

**(३) १६९७१ (१७-०८-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात दारिद्र् रेषेच्या यादीमध्ये फेरफार करण्यात आलेल्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत तसेच दारिद्र् रेषेखालील नागरिकांवर अन्याय करणाऱ्या दोषींवर कारवाई करुन कारवाईचा अहवाल मिळण्याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती यांना दिनांक ७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२४-०५-२०१७) :**(१) होय.
(२) व (३) पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर अंतर्गत ग्रामपंचायत हिवरा (बु.) येथील दारिद्रय रेषेखालील कुटुंब गणना २००२ च्या यादीमध्ये अपात्र कुटुंबांचा समावेश करुन पात्र कुटुंबांना वंचित ठेवल्या प्रकरणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर यांच्या स्तरावरुन सविस्तर चौकशी करण्यात आलेली आहे. यामध्ये दोषी आढळून आलेले कु.लीला गजभिये, तत्कालीन विस्तार अधिकारी (उद्योग) व श्री.डी.एल.लाखे, तत्कालीन ग्रामसेवक यांच्यावर प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे.

---

**ग्रामपंचायातीमधील संगणक परिचालकांना नियमित व वेळेवर मानधन मिळण्याबाबत**

**(४) २१५११ (१७-०८-२०१५). श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामविकास जलसंधारण विभागाच्या शासन निर्णयामुळे भंडारा जिल्हयातील लाखांदुर तालुक्यात स्थापन केलेल्या संग्राम पक्षाच्या कामासाठी ग्रामपंचायातीमध्ये संगणक परिचालकांची डाटा ऑपरेटर म्हणून नियुक्ती करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परिचालकांना नियमित व वेळेवर मिळत नसणारे मानधन नियमित मिळावे मागील तीन वर्षापासून कपात केलेला मानधन देण्यात यावा, मानधनात वाढ करावी आदी मागण्यासाठी सदर परिचालकांनी बेमुदत काम बंद आंदोलन पुकारले, हे खरे आह काय,
(३) असल्यास, सदर परिचालकांची अडचण लक्षात घेता राज्यातील अशा परिचालकांना न्याय देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२४-०५-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) शासन परिपत्रक दि.२६ फेब्रुवारी, २०१५ व शासन शुध्दीपत्रक दि.२ मार्च, २०१५ नुसार उदिष्टपूर्ती करणाऱ्या संगणक परिचालकांचा (VLE) मोबदला दरमहा रक्कम रु. ४५००/- इतका करण्यात आलेला आहे. तसेच थकीत देयक अदायगीबाबत मार्गदर्शक सुचनांचे परिपत्रक दि.१३.५.२०१५ रोजी निर्गमित करण्यात आले आहे.
प्रधान सचिव (ग्रामविकास) स्तरावर सर्व संबंधितांना या अनुषंगाने वेळोवेळी सुचना निर्गमित केल्या आहेत. तसेच थकीत देयक अदायगीबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**करमाळा (जि.सोलापूर) येथील बचत गटांना बचत भवन उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(५) २३८३३ (१४-०८-२०१५). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा तालुक्यातील महिला बचत गट व दारिद्रय रेषेखालील महिला बचत गटांच्या उत्पादित वस्तु विक्रीसाठी करमाळा येथे रु.५० लाख किंमतीचे बचत भवनाचे काम पुर्ण झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास या बचत भवनात पंचायत समितीचे लाभार्थी साहित्य ठेवले जात असुन गोदाम म्हणुन याचा उपयोग केला जातो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बचत भवनाचे काम पुर्ण होऊनही बचत भवन अद्यापही बचत गटांना उपलब्ध करुन दिले गेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार बचत गटांना उपलब्ध बचत भवन करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२४-०५-२०१७) :**(१) होय, तथापि विद्युत जोडणे, लाईट फिटींग व पाणीपुरवठा व्यवस्था इत्यादी सुविधा पुरविणे बाकी आहे.
(२) होय, पंचायत समितीला अपुरे गोदाम असल्याने विविध योजनेकरिता प्राप्त झालेले साहित्य लाभार्थींना वाटप करेपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात बचत भवनात ठेवण्यात आले होते. तथापि सद्या हे तालुका विक्री केंद्र रिकामे आहे.
(३) होय.
(४) होय, तथापि अपूर्ण राहिलेली कामे उदा. विद्युत जोडणी, लाईट फिटींग व पाणीपुरवठा व्यवस्था इत्यादी सुविधा पुरविणेकरीता आवश्यक असणारा निधी मागणीचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### गोंदिया जिल्ह्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या यादीचे सर्वेक्षण करण्याबाबत

**(६) २४८७८ (१७-०८-२०१५). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया जिल्ह्यातील गेल्या १५ वर्षापासून दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या यादीचे सर्वेक्षण करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे अनेक कुटुंब सदर योजनेपासून वंचित राहिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, १५ वर्षापासून करण्यात न आलेले दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या यादीचे सर्वेक्षण तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२४-०५-२०१७) :**(१) व (२) नाही.

राज्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबे निश्चित करण्याकरीता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यात दारिद्रय रेषेखालील कुटुंब गणना २००२ करण्यात आली असून पात्र कुटुंबांच्या याद्या शासन निर्णय क्र.दारेग-२००६/प्र.क्र.८२८/योजना-१ दि.७ नोव्हेंबर, २००६ अन्वये जाहीर करण्यात आलेल्या आहेत. या पात्र कुटुंबाना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यात येत आहे.

(३) व (४) राज्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंब निश्चित करण्याकरीता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यात सामाजिक आर्थिक जात सर्वेक्षण २०११ करण्यात येत आहे. आता या प्रक्रियेतील प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले असून प्रारुप यादी प्रसिध्द करणे, दावे व आक्षेप निकाली काढणे इत्यादी प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. सदर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सर्वेक्षणाची परिपूर्ण यादी केंद्र शासनास सादर करण्यात येणार असून त्यानंतर केंद्र शासनाकडून प्राप्त निकषांनुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

---

**गिरवली ते सोन्नेवाडी (ता.भूम, जि.उस्मानाबाद) येथील रस्त्यावर म.ग्रा.रो.ह.या. अंतर्गत वृक्ष लागवड कामादरम्यान मृत झालेल्या महिलेच्या वारसाला वाढीव सानुग्रह देण्याबाबत**

**(७) ३५७८४ (२२-०१-२०१६). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरवली ते सोन्नेवाडी (ता.भूम, जि.उस्मानाबाद) येथील रस्त्यावर म.ग्रा.रो.ह.या. अंतर्गत वृक्ष लागवड करित असताना एका महिलेचा दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास अपघाती मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अपघातग्रस्थ महिलेच्या वारसाला वाढीव सानुग्रह अनुदान मिळण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.रोजगार हमी योजना मंत्री यांच्याकडे दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या सुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१५-०६-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) मौजे गिरवली ते सोन्नेवाडी, ता.भूम, जि.उस्मानाबाद या रस्त्यावर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वृक्षलागवडीचे काम करीत असताना दि.१५/९/२०१४ रोजी एका महिला मजुराचा अपघाती मृत्यू झाला. त्यांच्या वारसास नियमानुसार देय असणारी रक्कम रु.५०,०००/- सानुग्रह अनुदान म्हणून जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्या आदेश क्र.२०१५/मग्रारोहयो/कक्ष-६/अनिसाअनु/सिआर-०७/३८, दि.१५.४.२०१५ अन्वये तहसिलदार, भूम यांचे मार्फत देण्यात आली आहे. मा.श्री.राहूल मोटे, विधानसभा सदस्य, परांडा यांनी अपघातग्रस्त महिलेच्या वारसाला वाढीव सानुग्रह अनुदान मिळणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयास त्यांचे दि.२१.९.२०१५ रोजीचे पत्र दि.१.१०.२०१५ रोजी प्राप्त झाले. मा.श्री.राहूल

मोटे, विधानसभा सदस्य, परांडा यांना जिल्हाधिकारी कार्यालयाचे पत्र दि.१०.११.२०१५ रोजी शासन नियमाप्रमाणे जेवढे सानुग्रह अनुदान देय आहे, तेवढे अनुदान संबंधिंताच्या वारसास देण्यात आले असल्याचे कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे येराडा (ता.पाटण) येथील दराडे सहकारी पाणी पुरवठा संस्थेच्या पुर्नबांधणीस निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(८) ३६७८९ (१५-०१-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे येराड (ता.पाटण) या ठिकाणी कोरडवाहू असणारे सुमारे २०० एकर क्षेत्र ओलिताखाली आणण्याकरीता सन १९७० मध्ये तत्कालीन महसूल मंत्री स्व. लोकनेते बाळासाहेब देसाईसाहेब यांनी येराड सहकारी पाणी पुरवठा या नावाने सदरची सहकारी पाणी पुरवठा योजना कार्यान्वित केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २००५-०६ मध्ये मोठया प्रमाणात कोयना नदीस आलेल्या महापूरामुळे नदीकाठी कार्यरत असलेल्या या योजनेच्या पंप हाऊस व इंटेक विहिरीच्या आसपासची जमिन खचत गेल्यामुळे दिनांक ३१ जानेवारी, २०१५ रोजी अचानक सदर योजनेचे पंप हाऊस हे विद्युत मोटारी व पाईप लाईनसह उखडून पडल्याने या योजनेचे आवश्यक साहित्य हे जमिनीमध्ये गाढले गेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास या योजनेच्या झालेल्या नुकसानीमुळे २०० एकर क्षेत्र कोरडवाहू रहात असून या नुकसानीचा पंचनामा महसूल विभागाने करुन सदर योजनेच्या दुरुस्तीकरीता सांगली पाटबंधारे विभाग यांनी निधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात योजनेच्या विश्वस्तांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात राज्य शासनाने चौकशी केली आहे काय, अद्यापही चौकशी केली नसल्यास चौकशी न करण्याची व निधी उपलब्ध करुन न देण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२१-०४-२०१७) :**(१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) सदर योजनेच्या नुकसानीचा पंचनामा महसूल विभागामार्फत करण्यात आला असून तहसीलदार, पाटण यांनी योजनेचे तांत्रिक मुल्यांकन करणेबाबत सांगली पाटबंधारे विभाग, सांगली यांना दिनांक १९.३.२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

संबंधित लोकप्रतिनिधींनी त्यांच्या दिनांक ५.३.२०१५ रोजीच्या पत्रान्वये सदर पाणी पुरवठा संस्थेच्या पुनर्बांधणीस निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी अधिक्षक अभियंता, सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली यांचेकडे केली होती. मात्र सहकारी पाणी पुरवठा योजनांची देखभाल व दुरुस्ती करणे याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेची असल्याने अशा संस्थांच्या पुनर्बांधणीसाठी / दुरुस्तीसाठी जलसंपदा विभागाकडून निधी उपलब्ध करुन दिला जात नाही.

---

**मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील ओसरविरा गावातील ग्रामसेवक व रोजगार सेवक यांनी केलेला गैरव्यवहार**

**(९) ३८७९८ (२०-०१-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील ओसरविरा गावातील शाळेच्या मैदानाकरिता रोजगार हमी योजनेअंतर्गत सन २०११-१२ साली प्रत्यक्षात काम करता ४३,६४४/- रुपये खर्च दाखवून ग्रामसेवक व रोजगार सेवक यांनी आर्थिक गैरव्यवहार केल्याचे दिनांक १४ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती चोकशी केली आहे काय,

(३) असल्यास, शासनाचा निधी संबंधितांकडून वसूल करणार आहे काय,

(४) असल्यास, चौकशी अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१५-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

सदर खर्च हा ओसरविरा शाळेच्या मैदानाकरीता झालेला नसून, सन २०११-२०१२ साली प्रत्यक्षात ओसविरा सरोवर मैदान सपाटीकरण करण्यात आले आहे. सदर कामासाठी मस्टर क्रमांक ०३७११६ अन्वये मजूरीची रक्कम रुपये ४३,६४४/- पोस्टाद्वारे मजुरांना अदा करण्यात आली आहे.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयातील आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रम व डोंगरी कार्यक्रमातंर्गत कामे पूर्ण झाली असतानाही ठेकेदारांची देयके प्रलंबित असल्याबाबत**

**(१०) ४५२९० (२९-०४-२०१६). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रम व डोंगरी कार्यक्रमातंर्गत कामे पूर्ण झाली असतानाही ठेकेदारांना अद्यापी त्यांची देयके अदा करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डोंगरी विकास कार्यक्रमांतर्गत जिल्हापरिषदेकडे सन २००८-०९, २००९-२०१०, २०१०-११, २०११-१२ करीता २४ लाख ६१ हजार रुपयांचा निधी तसेच स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत १० लाख ८५ हजार रुपयांचा निधी प्राप्त असतानाही जिल्हापरिषदेकडून ठेकेदारांना बिले अदा न करता सदर निधी शासनाला अखर्चित दाखवून परत करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अखर्चित दाखवून जिल्हापरिषदेकडून परत करण्यात आलेला निधी शासनास प्राप्त झाला आहे काय,
(४) असल्यास, जिल्ह्यातील जी कामे पुर्ण आहेत त्याकरीता तसेच ठेकेदाराची बिले अदा करण्याकरीता शासन अखर्चित निधी पुन्हा जिल्ह्यापरिषदेकडे वर्ग करणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०४-२०१७)** :(१) व (२) होय,
तथापि, सदर अखर्चित निधी खर्च करण्यास मंजूरी देण्याबाबतचा जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेला प्रस्ताव मान्य करण्यात आला असून त्यानुसार आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत दि.१५.१.२०१६ च्या ज्ञापनान्वये व डोंगरी विकास कार्यक्रमांतर्गत दि.५.३.२०१६ च्या ज्ञापनान्वये अखर्चित निधी खर्च करण्यात मंजूरी देण्यात आली आहे. त्यानुसार ठेकेदारांची देयके दि.३१.३.२०१६ पर्यंत अदा करण्यात आली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुरखेडा (जि.गडचिरोली) तालुक्यातील तीन लघुसिंचन तलावांची रोजगार हमी योजने अंतर्गत मंजुर झालेली कामे प्रलंबित असल्याबाबत

**(११) ४८५८७ (०३-०५-२०१६). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुरखेडा (जि.गडचिरोली) तालुक्यातील सिंचाई विभागातर्फे बामणी, जांभुळखेडा व सोनेरांगी या तीन लघुसिंचन तलावांची रोजगार हमी योजने अंतर्गत मंजुर झालेली कामे वनसंवर्धन अधिनियम १९८० च्या तरतुदी लागु झाल्यामुळे पूर्ण झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कार्यकारी अभियंता (ल.पा) जि.प. यांनी केंद्र शासनाचे पर्यावरण व वन विभागाचे पत्रान्वये मागणी करण्यात आलेली एन.पी.व्ही. ची रक्कम जिल्हाधिकारी गडचिरोली यांना पत्र क्र. जिपग/सि/आरे/११२०/०० दिनांक ०२ जुलै, २००९ अन्वये कळविण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त एन.पी.व्ही रक्कम जमा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१३-०६-२०१७)** :(१) होय.
(२) होय.

बामणी, जांभुळखेडा व सोनेरांगी या तीन लघुसिंचन तलावांपैकी जांभुळखेडा व सोनेरांगी या तलावांचे वनप्रस्ताव केंद्र शासनाने फेटाळले आहेत. तर बामणी, ता.कुरखेडा या ल.पा. तलावासाठी केंद्र शासनाची मंजूरी मिळाली होती. सदर तलावाच्या कामासाठी वनविभागास पर्यायी वनिकरण व इतर बाबीसाठी रक्कम उपलब्ध करुन देण्याचे कार्यकारी अभियंता (ल.पा.), जि.प. गडचिरोली यांनी जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना दि.०२.०७.२००९ च्या पत्रान्वये कळविले होते.

(३) व (४) सध्या जुन्या रोजगार हमी योजनेअंतर्गत कोणतेही काम हाती घेतले जात नाही. याबाबत दिनांक १८.०५.२०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार जुन्या रोहयोतील उर्वरीत १४७ कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणा व जिल्हाधिकारी यांच्यावर सोपविण्यात आली. जुन्या रोहयो अंतर्गत ३०.०६.२०१५ नंतर कोणतेही काम पूर्ण करण्यास मंजूरी देण्यात ओलेली नाही. सबब सदरचे काम रोहयोतून पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देता येणार नाही.

---

**मौजे जिगाव ते वडनेर रामाक्र. २७७ (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) या मार्गावर संरक्षण भिंत बांधण्याबाबत**

**(१२) ५०५०० (२९-०४-२०१६). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर मतदार संघाच्या नांदुरा तालुक्यातील मौजे जिगाव ते वडनेर रामाक्र. २७७ या रस्त्याला जोडणाऱ्या औरंगपुर ग्रामा.५१ या मार्गावर संरक्षण भिंत नसल्याने रस्त्याच्या कडा खचून जावून रस्त्याचे नुकसान होत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपरोक्त संरक्षण भिंत बांधणे अत्यंत गरजेचे असून उपरोक्त संरक्षण भिंत बांधकामासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगाव यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०६-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगाव यांना सुचित केलेले नाही.

(३) औरंगपूर जोडरस्ता हा ग्रामीण मार्ग क्र.५१ चा भागरस्ता असुन सदर रस्त्याच्या खचलेल्या कडा व रस्त्याचे डांबरीकरणाचे काम सन २०१६-१७ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत जिल्हा परिषदेने पूर्ण केले आहे.

---

**येवला (जि.नाशिक) येथील मुक्तीभूमिला ‘अ’ वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा मिळणेबाबत**

**(१३) ५४१६६ (२३-०८-२०१६). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला (जि.नाशिक) येथील मुक्तीभूमिला ‘अ’ वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२१-०६-२०१७) :**(१) स्थानिक लोकप्रतिनिधींचे निवेदन जिल्हाधिकारी यांना प्राप्त झालेले आहे.
(२) व (३) येवल्याच्या मुक्तीभूमीला “ब” वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, नाशिक यांनी ग्रामविकास विभागास सादर केला होता. तो प्रस्तव ग्रामविकास विभागाने दिनांक २८.११.२०१६ च्या पत्रान्वये पर्यटन विभागास पाठविला आहे. याबाबत पर्यटन स्थळास दर्जा देण्याबाबत शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या तरतुदीनुसार प्रस्ताव पाठविण्याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांना सूचित करण्यात आले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त झाला असून त्याची छाननी करण्यात येत आहे.

---

**आळसंद (जि.सांगली) येथील भाळवणी-आळसंद रस्त्यावर पुनर्वसित झालेल्या उमरकांचन गावाला प्राथमिक सुविधा पुरविण्याबाबत**

**(१४) ५६७०१ (२०-०८-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आळसंद येथील (जि.सांगली) भाळवणी-आळसंद रस्त्यावर पुनर्वसित झालेल्या उमरकांचन गाव प्राथमिक सुविधांपासून वंचित असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गावास प्राथमिक सुविधा अद्यापपर्यंत न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या गावास तातडीने प्राथमिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-०४-२०१७) :**(१) अशंत: खरे आहे.
(२) व (३) पुनर्वसन अंतर्गत नागरी सुविधांची कामे प्रगतीपथावर आहेत.

पुनर्वसन अंतर्गत देय १८ नागरी सुविधांपैकी प्राथमिक १४ नागरी सुविधा कामे पूर्ण असून उर्वरीत ४ नागरी सुविधांपैकी डांबर पोहोच रस्ता या नागरी सुविधा कामाची निविदा कार्यवाही प्रगतीपथावर आहे. तसेच नळ योजनेची वाढीव उर्वरीत कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. शेती पोहोच रस्ता शेतजमीन वाटपाअभावी अद्याप हाती घेण्यात आलेला नाही. गायरान जमीनीचे वाटप आवश्यकते नुसार महसूल खात्यामार्फत करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील शाहू महाराजांनी निर्माण केलेल्या राधानगरी धरणातील जलाशयात नयनरम्य आयलँडची झालेली दुरवस्था**

**(१५) ५७९६५ (२३-०८-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयातील शाहू महाराजांनी निर्माण केलेल्या राधानगरी धरणातील जलाशयात नयनरम्य आयलँड असून या आयलँडवर धरणाच्या बांधकामावर देखरेखीसाठी बांधलेली वास्तू शासनाच्या दुर्लक्षामुळे भग्नावस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची ऐतिहासिक वास्तू नष्ट होण्यापूर्वी डागडुजी व जतन करून आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटन स्थळ करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-०४-२०१७)** :(१) सदर वास्तु राधानगरी धरणाच्या बुडीत क्षेत्रात येत असल्याने या वास्तुची देखरेख शक्य होत नाही.
(२) राधानगरी धरण हे शाहू कालीन असल्याने बुडीत क्षेत्रातील बेटावर असलेल्या वास्तुच्या मालकीबाबत अभिलेख उपलब्ध नाहीत. या वास्तुवर जलसंपदा विभागाकडून कोणताही खर्च करण्यात आलेला नाही. त्यामुळे या वास्तुची डागडूजी व जतन करुन आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटन स्थळ निर्माण करण्याचे सद्य:स्थिती मध्ये विचाराधीन नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील पेंच जलाशय मस्त्य विभागाला हस्तांतरीत करण्याबाबत**

**(१६) ५८९२१ (२४-०८-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मत्स्य विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हयातील पेंच जलाशय मस्त्य विभागाला हस्तांतरीत करण्याचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे एप्रिल, २०१६ च्या पाचव्या आठवड्यात दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२१-०४-२०१७) :**(१) होय.
(२) पेंच जलाशय सन १९८३ पासून महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाकडे असून, दि.३.२.३०१६ च्या शासननिर्णयान्वये त्यास ५ वर्षासाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातल्या मनरेगा कामात झालेला गैरव्यवहार**

**(१७) ६४४४१ (२९-०८-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत अनेक ठिकाणी मजुराना कामे उपलब्ध करून दिल्या जात नाहीत अशा तक्रारी मनरेगाच्या नागपूर येथील आयुक्त कार्यालयाकडे दाखल आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) योजनेंतर्गत कामामध्ये गैरव्यवहार करणाऱ्या अधिकारी व कंत्राटदारावर मकोका (संघटीत गुन्हेगारी प्रतिबंध कायदा) अंतर्गत कारवाई संदर्भात मनरेगाच्या राज्य आयुक्तांनी अमरावतीचे जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यपालन अधिकारी यांना पत्राद्वारे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तक्रारीनुसार मनरेगा योजनेच्या कामात गैरव्यवहार करणाऱ्या अधिकारी व कंत्राटदारावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१२-०६-२०१७) :**(१) हे खरे आहे.
सदर निवेदन आयुक्त कार्यालय (नरेगा), नागपूर यांचेकडे दि.२८.०३.२०१६ रोजी प्राप्त झाले आहे.
(२) हे खरे आहे.
याबाबत आयुक्त (नरेगा) नागपूर यांनी त्यांचे पत्र दि.१२.०४.२०१६ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी यांनी पोलीस अधिकारी यांचे सोबत चर्चा करुन नियमानुसार निर्णय घ्यावा, असे निर्देश दिले आहेत.
(३) अशा प्रकारची भ्रष्टाचाराबाबतची तक्रार व प्रकरण अमरावती जिल्ह्यात प्राप्त नाही. त्यामुळे मकोका संदर्भात अधिकारी व कंत्राटदारांवर कारवाई करण्यात आलेली नाही. तथापि, वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या तक्रारीनुसार संबंधिताविरुध्द नियमानुसार अमरावती जिल्ह्यात कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर जिल्हा परिषदेच्या शाळांमधील मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख तसेच विस्तार अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(१८) ६५०९७ (२७-०१-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हा परिषदेच्या शाळांमधील मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख तसेच विस्तार अधिकाऱ्यांची ११६ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास या रिक्त पदांमुळे जिल्हापरिषदेच्या शाळांमधील शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०४-२०१७) :**(१) लातूर जिल्हा परिषदेच्या शाळांमधील मुख्याध्यापक १३०, केंद्रप्रमुख २२ व विस्तार अधिकारी १३ अशी एकुण १६५ पदे रिक्त आहेत.

(२) सध्या लातूर जिल्हा परिषदेकडे मुख्याध्यापक व केंद्रप्रमुखाच्या रिक्त पदावर इतर केंद्रप्रमुख व शाळेतील सेवा जेष्ठतेनुसार इतर सह शिक्षक यांच्याकडे अतिरिक्त पदभार देण्यात आलेला असल्याने शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम झालेला नाही.

(३) मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी यांची पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली असून शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम झालेला नाही.

(४) मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी या संवर्गातील बिंदुनामावली मा. सहाय्यक आयुक्त, मागास वर्ग कक्ष यांच्याकडून प्रमाणित करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. हे काम पूर्ण होताच रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**राज्यातील २६ अपूर्ण सिंचन प्रकल्पांची कामे पूर्ण करण्यासाठी निधी मिळण्याबाबत**

**(१९) ६५१०० (२७-०१-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.अनिल बाबर (खानापूर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.आशिष देशमुख (काटोल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २६ अपूर्ण सिंचन प्रकल्पांची कामे पूर्ण करण्यासाठी शासनाने केंद्र शासनाकडे ३६ हजार कोटीची मागणी केली होती परंतु केंद्राने फक्त ३६०० कोटी देण्याचे मान्य केल्याचे माहे सप्टेंबर,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना मार्फत केंद्र शासनाने तातडीने निधी देण्यात यावा अशी योजना कार्यान्वित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील प्रामुख्याने दुष्काळी आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्याग्रस्त जिल्हयांमध्ये केंद्राच्या वाट्याला निधी देण्याची घोषणा मा.पंतप्रधानांनी करुनही हा निधी न मिळण्यामागची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदरहू सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधी मिळण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०६-२०१७) :**(१) अंशतः खरे आहे.

केंद्र शासनाच्या दि.२७.०७.२०१६ च्या मंत्रीमंडळ बैठकीतील निर्णयानुसार महाराष्ट्रातील २६ सिंचन प्रकल्पांचा प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजने अंतर्गत समावेश करण्यात आला आहे. सदर २६ प्रकल्पांकरीता सन २०१६-१७ ते सन २०१९-२० या कालावधीत केंद्र शासनाकडून रु.३८३० कोटी इतके केंद्रीय अर्थसहाय्य मिळणार आहे तसेच रु.१२,७७३ कोटी एवढा निधी दिर्घ मुदतीच्या (१५ वर्ष) व अल्प व्याजदराने कर्ज रुपाने उपलब्ध होणार आहेत.
(२) प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेअंतर्गत वेगवर्धीत सिंचन लाभ कार्यक्रमात समाविष्ट २६ अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण होण्यासाठी सन २०१६-१७ मध्ये रु.३९५ कोटी केंद्रीय अर्थसहाय्य मिळणार आहे. व नाबार्डच्या माध्यमातून रु.१७२३ कोटी एवढे कर्ज प्राप्त होणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) राज्य शासनास २६ प्रकल्प पूर्ण करणेसाठी आवश्यक राज्य शासन हिस्स्यांची रक्कम निश्चितपणे उपलब्ध करुन देता यावी यासाठी दिर्घकालीन सिंचन द्रव्यनिधी (LTIF) स्थापन करुन नाबार्डचे माध्यमातून दिर्घकालीन (१५ वर्ष मुदतीचे) व सवलतीच्या दरात सुमारे ६% व्याज दराने कर्जाची सुविधा केंद्र शासनाने निर्माण करुन दिली आहे. त्याअनुषंगाने, राज्यातील पंतप्रधान कृषी सिंचाई योजनेअंतर्गत २६ अपुर्ण सिंचन प्रकल्प डिसेंबर, २०१९ पर्यंत पुर्ण करण्यासाठी नाबार्ड कडून कर्ज रु.१२७७३ कोटी घेण्यास राज्य शासनाने मंजूरी दिली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रायगड जिल्हयातील महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेमध्ये कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी शासन सेवेत सामावून घेण्याबाबत

**(२०) ६५३५५ (०५-०१-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेमध्ये कार्यरत कंत्राटी कर्मचारांना शासन सेवेत कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे सप्टेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २००० पासून प्रधानमंत्री सडक योजनेत काम करणाऱ्या उक्त संस्थेतील कंत्राटी कामगारांना अद्याप पर्यंत कायमस्वरूपी शासन सेवेत सामावून घेण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बहुतंशी कर्मचाऱ्यांना वयोमर्यादेमुळे इतरत्र नोकरी मिळणे अवघड झाले असून कायमस्वरूपी सेवेत सामावून न घेतल्यामुळे उक्त कंत्राटी कामगारांना अनेक सोईसुविधांपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सन १९९४-९५ भुकंप व पुनर्वसन विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायमस्वरूपी सामावून घेण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर संस्थेतील कंत्राटी कर्मचारांना कायमस्वरूपी शासन सेवेत सामावून घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२४-०५-२०१७) :**(१) होय, खरे आहे.
(२) व (३) महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांनी शासकीय सेवेत कायम करण्याच्या मागणीसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई तसेच खंडपीठ औरंगाबाद व नागपूर येथे याचिका दाखल केलेल्या असून सदर प्रकरणे सद्यस्थितीत न्यायप्रविष्ट आहेत.
(४) होय.
(५) व (६) प्रधानमंत्री ग्रामसडक योजना ही कालबध्द स्वरुपाची केंद्र पुरस्कृत योजना असून, केंद्र शासनाने सदर योजनेंतर्गतची कामे आता मार्च, २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन केले असल्याने, त्यानंतर या कर्मचाऱ्यांची या योजनेसाठी आवश्यकता राहणार नाही.

---

## कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत वांग मराठवाडी मध्यम धरण प्रकल्पामुळे मराठवाडी-उमरकांचन-जिंती या रस्त्याची झालेली दुरवस्था

**(२१) ६५४२७ (०२-०१-२०१७). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाटण विधानसभा मतदारसंघात कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत वांग मराठवाडी मध्यम धरण प्रकल्पामुळे मराठवाडी-उमरकांचन-जिंती इ. जि. मा. १०९ या रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्याच्या पर्यायी वळण रस्त्याचे कामास मुख्य अभियंता (वि.प्र.) जलसंपदा विभाग, पुणे यांचेकडून ५.१९ कोटी रुपयांच्या निधीस मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचे काम सध्या सुरु असून अंदाजपत्रकामध्ये तरतूद केल्याप्रमाणे होत नसल्याने अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम संबंधित कंत्राटदाराकडून केले जात आहे व पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्याकडून दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या निकृष्ट दर्जाच्या सुरु असलेल्या वळण रस्त्याची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याबाबत आणि सदरचे काम हे पुन्हा करण्याबाबत जलसंपदा विभागाकडून सूचना व्हाव्यात याकरिता दिनांक १२ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.जलसंपदा मंत्री यांना पत्राद्वारे कळविण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०६-२०१७) :**(१) होय.

(२) होय.

(३), (४) व (५) नाही, मा.आमदार श्री.शंभुराज देसाई, विधानसभा सदस्य पाटण यांनी दिनांक.१२/०९/२०१६ रोजीच्या पत्राद्वारे वळण रस्त्याची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत अधिक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रक मंडळ, पुणे व या प्रदेशांतर्गत कार्यकारी अभियंता, उरमोडी धरण विभाग, सातारा यांचेकडून कामाची तपासणी करण्यात येत आहे.

(६) कार्यवाही प्रगतीत असल्याने विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील १९१ सिंचन प्रकल्पांच्या उभारणीत झालेला गैरव्यवहार

**(२२) ६५४२९ (०२-०१-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जल आराखडा नसताना मान्यता दिलेल्या राज्यातील १९१ सिंचन प्रकल्पांच्या उभारणीत झालेल्या गैरव्यवहाराची तपासणीसाठी नेमलेल्या समितीचा अहवाल शासनास दिनांक १३ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास सादर झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करत असताना सिंचन विभागातील अधिकाऱ्यांनी कागदपत्र उपलब्ध करून देत नसल्यामुळे १९१ सिंचन प्रकल्पांपैकी केवळ १२६ प्रकल्पांच्या मिळालेल्या माहितीवरच समितीने अहवाल सादर केला असल्याचे समिती अध्यक्षांनी वरिष्ठांना कळवले होते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच ५ हजार ६४० कोटी रुपये खर्च प्रकल्पावर होणार असल्याने प्रशासकीय मान्यतेपूर्वीच प्रकल्पाच्या कंत्राटदाराला २५० कोटी रुपयाचे अग्रीम रक्कम दिल्याची माहिती निदर्शनास आली व अनेक प्रकल्पांच्या निविदा प्रक्रिया व संपूर्ण प्रक्रियामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळल्याचे स्पष्ट अहवालात म्हटले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त समितीच्या अहवालातील शिफारसींचे पालन करण्याबाबत व सिंचन प्रकल्पांच्या उभारणीत गैरव्यवहार करणाऱ्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०५-२०१७) :**(१) होय.
(२) अंशत: खरे आहे.
दिनांक ३१/०७/२०१६ अखेर समितीस माहिती प्राप्त झालेल्या १३० प्रकल्पांबाबत अहवाल सादर केला आहे.
(३) अंशत: खरे आहे.
१६ प्रकल्प कामात निविदेत तरतूद नसताना बांधकाम अग्रिम दिल्याची तसेच प्रारुप निविदा कागदपत्रांना सक्षम प्राधिकरणाची मान्यता नसताना निविदा सुचना प्रसिध्दीस देणे अशा स्वरुपाच्या अनियमिततेचा उल्लेख अहवालात आहे.
(४) चौकशी अहवालाची छाननी प्रगतीत आहे. छाननी अंती संबंधितांवर आवश्यकतेनुसार जबाबदारी निश्चित करणेत येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात जात वैधता प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या शिक्षकांना जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने नोटिसा पाठविल्याबाबत

**(२३) ६६३६५ (१०-०१-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जात वैधता प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या शिक्षकांना जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने नोटिसा पाठविल्या असून याबाबत सात दिवसात खुलासा न दिल्यास त्यांची सेवा समाप्त केली जाऊ शकते असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी कळविल्याची माहिती दिनांक ६ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(३) तसेच सदरहू शिक्षकांना जात वैधता प्रमाणपत्र न मिळण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, संबंधित शिक्षकांना विनाविलंब जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१७) :**(१) होय. ज्या कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही अशा संबंधित शिक्षकांना दि.३०-७-२०१६ च्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटिस देण्यात आली होती. व जात वैधता प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या कर्मचाऱ्यांची दिनांक २८-९-२०१६ रोजी इन कॅमेरा सुनावणी घेण्यात आली.

(२), (३), (४) व (५) सुनावणीत दिलेल्या सूचनांनुसार ४६ प्राथमिक शिक्षकांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे दिनांक २८-१०-२०१६ रोजी कारणे दाखवा नोटिस देण्यात आली. ४६ प्राथमिक शिक्षकांपैकी ३६ प्राथमिक शिक्षकांनी जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रस्ताव दाखल केल्याबाबतची पोचपावती सादर केलेली आहे. उर्वरित १० प्राथमिक शिक्षकांपैकी अनुसूचित जमातीचे २ प्राथमिक शिक्षकांचे प्रमाणपत्र जात वैधता पडताळणी समितीने अवैध ठरविल्याने मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठामध्ये रिट याचिका दाखल असून अंतिम निर्णय झालेला नाही.तसेच अनुसूचित जमातीचे २ प्राथमिक शिक्षक हे दिनांक १७-१०-२००१ पूर्वी शासकीय सेवेत नियुक्ती झाले असल्याने त्यांना सेवेत संरक्षण देण्यात आलेले आहे.
उर्वरित जात पडताळणी प्रमाणपत्र अथवा जात प्रमाणपत्र पडताळणीकामी प्रस्ताव दाखल करुन पोचपावती सादर न करणाऱ्या संबंधित ६ प्राथमिक शिक्षकांवर महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे नियम ६ नुसार सेवा समाप्तीची पुढील कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

---

**ठाणे जिल्हा परिषदेतील ग्रामपंचायत उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेला गैरव्यवहार**

**(२४) ६६५१५ (२७-०१-२०१७). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा परिषदेतील ग्रामपंचायत उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ग्रामपंचायत दप्तर तपासणीच्या नावाखाली ग्रामसेवकांना आर्थिक गैरव्यवहार करण्यास भाग पाडल्याचे व आर्थिक देवाण-घेवाण न केल्यास कारवाई करण्याची धमकी दिल्याने ठाणे जिल्ह्यातील ग्रामसेवक युनियनने सामुहिक रजा घेतली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार ग्रामपंचायत उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०४-२०१७) :**(१) ठाणे जिल्ह्यातील ग्रामसेवक युनियनने सामुहिक रजा घेतली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे.

ग्रामपंचायतीच्या कामकाजात सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने व ग्रामपंचायतीच्या उत्पन्नामध्ये वाढ करणेचे दष्टीने ठाणे जिल्हा परिषदेअंतर्गत एकूण २७ ग्रामपंचायतीची दप्तर तपासणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांचे आदेश दिनांक १९.८.२०१६ अन्वये २७ अधिकाऱ्यांमार्फत करणेबाबत आदेशीत करण्यात आले होते. परंतु दिनांक २६.८.२०१६ रोजी संबंधित ग्रामसेवकांनी ग्रामपंचायतीचे दप्तर तपासणीसाठी उपलब्ध करुन दिले नाही.

महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन, शाखा ठाणे यांनी त्यांचेकडील दिनांक २९.८.२०१६ रोजी दिलेल्या निवेदनामध्ये दिनांक २६.८.२०१६ पासून बेमुदत सामुहिक रजेवर जात असल्याचे नमुद केले आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन, शाखा ठाणे यांचे दिनांक २९.८.२०१६ रोजीच्या निवेदनावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांचे समवेत केलेल्या सकारात्मक चर्चेअंती दिनांक ३१.८.२०१६ रोजी आंदोलन स्थगित करणेत आल्याचे ग्रामसेवक युनियन ने दिनांक ३१.८.२०१६ च्या पत्रान्वये कळविले आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कळमना (ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर) ग्रामपंचायत मधील नागरिकांची करण्यात आलेली आर्थिक, सामाजिक जनगणना चुकीची झाल्याबाबत**

**(२५) ६६७६० (१०-०१-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळमना (ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर) ग्रामपंचायत मधील नागरिकांची सन २०१०-११ मध्ये करण्यात आलेली आर्थिक, सामाजिक जनगणना चुकीची झाल्याने पंतप्रधान आवास योजनेपासून लाभार्थी वंचित राहत असल्याकारणाने ग्रामपंचायत सदस्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन सामाजिक, आर्थिक जातीनिहाय जनगणना दुस-यांदा करण्याची मागणी माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२४-०५-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

सरपंच व सचिव ग्रामपंचायत कळमना, ता.बल्लारापूर, जि.चंद्रपूर यांच्या संयुक्त स्वाक्षरीचे निवेदन जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना दि.७.९.२०१६ रोजी सादर करण्यात आले.
(२) सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण-२०११ चंद्रपूर जिल्ह्यात २ ऑक्टोंबर, २०११ ते १७ नोव्हेंबर, २०११ या कालावधीत करण्यात आले. सदर सर्वेक्षणाच्या प्रारुप याद्या दि.१० मार्च, २०१५ रोजी ग्रामपंचायत स्तरावर प्रसिध्द करण्यात आल्या. याद्या प्रसिध्द झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत आक्षेप नोंदविणे आवश्यक होते. याद्यांबाबत प्राप्त आक्षेपाप्रमाणे सुधारणा करुन अंतिम याद्या दि.५ जानेवारी, २०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आल्या. यानंतर ग्रामपंचायत कळमना यांचेकडून आक्षेप प्राप्त झाल्याने त्याचा विचार करण्यात आला नाही. सदर बाब सरपंच, ग्रामपंचायत, कळमना यांना गट विकास अधिकारी, पं.स., बल्लारपूर यांचे मार्फत दि.१४.०९.२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परांडा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील चिंचपूर (ब्रु.) येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(२६) ६६८०४ (२७-०१-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परांडा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील चिंचपूर (बु.)येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील चार पैकी दोन शिक्षकांची पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवदेन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार जिल्हा परिषदेच्या शाळेतील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०४-२०१७) :**(१) होय.

(२) सदर निवेदन आवश्यक कार्यवाही करण्यासाठी जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडे दिनांक २३ डिसेंबर, २०१६ च्या शासन पत्रान्वये पाठविण्यात आले आहे.

(३) व (४) परांडा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील चिंचपूर (बु) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत दिनांक ३०-७-२०१६ पर्यंत विद्यार्थी पटसंख्येनुसार ४ पदे मंजूर असून ४ शिक्षकांची पदे कार्यरत होती. तथापि दिनांक ३१-७-२०१६ पासून एका प्राथमिक शिक्षकास निलंबित केले असल्याने सद्य:स्थितीत प्राथमिक शाळेत ०३ प्राथमिक शिक्षक कार्यरत असून ०१ प्राथमिक शिक्षकाचे पद रिक्त आहे. सदरचे रिक्त पदे हे सन २०१६-१७ च्या संचमान्यतेनुसार होणाऱ्या समायोजन प्रक्रियेमध्ये भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यातील ठराविक ठेकेदारासाठी निविदा कामाच्या अटीमध्ये केलेला फेरबदल**

**(२७) ६७१६३ (०५-०१-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यातील ठराविक ठेकेदारासाठी गैरव्यवहाराने निविदा कामाच्या अटी मध्ये केलेल्या फेरबदलाबाबतची तक्रार आणि सदरच्या कामांच्या निविदा प्रक्रियेस रद्दता देऊन फेर निविदा काढण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०४-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) सन्माननीय सदस्यांना मागणीच्या अनुषंगाने सदरहू कामाबाबत शासन नियमाप्रमाणे जिल्हा परिषदेकडून द्वितीय मागणीचे शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात आले असून निविदा सादर करण्यास ८ दिवसाची मुदत वाढविण्यात आली, जेणेकरुन उर्वरित इच्छुक ठेकेदारांना सुध्दा निविदा भरण्यास पुरेसा वेळ मिळेल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोली (जि.हिंगोली) तालुक्यातील डिग्रसवाडी येथील मग्रारोहयोच्या कामात झालेला गैरकारभार

**(२८) ६७६७९ (०९-०१-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली (जि.हिंगोली) तालुक्यातील डिग्रसवाडी येथील मग्रारोहयोच्या कामावर मृत, अपंग व्यक्तींच्या नावे असल्याने या प्रकरणात मा.मुख्यमंत्र्यांच्या आदेशावरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी होणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, सदर चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१६-०६-२०१७) :**(१), (२) व (३) होय.

मौ.डिग्रसवाणी, ता.जि.हिंगोली येथील रोहयो कामात झालेल्या कोटयवधीच्या घोळाची चौकशी करणे याबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. ७ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या लोकशाही दिनी "या प्रकरणाची चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने घ्यावी" असे निदेश मा. मुख्यमंत्री यांनी दिले होते. त्यानुसार पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली यांनी त्यांच्या दि. २८.१०.२०१६ च्या पत्रान्वये चौकशीचा प्रगती अहवाल पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांच्यामार्फत शासनास सादर केला आहे. तथापि, प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी करणे, संबंधितांचे जबाब नोंदविणे, विविध मुद्दयांची माहिती हस्तगत करणे इ. चौकशी करणे शिल्लक असल्याने अंतिम चौकशी अहवाल अद्याप शासनास सादर करण्यात आलेला नाही. सदर अंतिम चौकशी अहवाल तत्काळ सादर करण्याचे निदेश पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली यांना शासनाच्या दि. ८ मे, २०१७ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नंदगाव (जि.नाशिक) तालुक्यातील सावरगावच्या जिल्हा प्राथमिक शाळेत शिक्षकाने गैरवर्तन केल्याबाबत**

**(२९) ६७७७३ (१६-१२-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदगाव (जि.नाशिक) तालुक्यातील सावरगावच्या जिल्हा प्राथमिक शाळेत एका शिक्षकाने ७ वीच्या वर्गात मुलांच्यासमोर मद्यपान केल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालकांनी अधिकारी जोवर प्रत्यक्ष पहाणी करीत नाहीत तोपर्यंत वर्ग बंद ठेवण्याचा निर्धार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदर शिक्षकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०४-२०१७) :**(१) होय.

(२) नाही.

(३) व (४) संबंधित शिक्षकास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,नाशिक यांच्या दिनांक २-१२-२०१६ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले असून त्यांचेवर दिनांक १४-१२-२०१६ च्या ज्ञापनान्वये दोषारोप पत्र बजावून विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु केलेली आहे.

तसेच गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती, नांदगाव यांनी अहवाल सादर करण्यास उशीर केल्याने, त्यांना निलंबित करण्याचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नाशिक यांच्या दिनांक २८-१२-२०१६ च्या पत्रान्वये मा. आयुक्त, शिक्षण विभाग, पुणे यांचेकडे सादर करण्यात आला आहे.

---

**राज्यात पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत मंजूर कामांना निधी देण्याबाबत**

**(३०) ६७८०५ (१६-१२-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या कामांच्या तुलनेत अत्यल्प निधी वितरीत झाल्याने राज्यातील रस्त्याची कामे प्रलंबित असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेअंतर्गत मंजूर कामांना निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०४-२०१७) :**(१) हे खरे नाही.

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत केंद्र व राज्य ६० : ४० असे निधीचे धोरण निश्चित करण्यात आलेले असून त्यानुसार सन २०१६-१७ या वर्षात आतापर्यंत केंद्र शासनाकडून प्राप्त रु.६०६.०० कोटी व राज्य शासनाचा समरुप राज्य हिस्सा रु.४०४.०० कोटी तसेच सन २०१५-१६ चे राज्य शासनाचे मागील दायित्व रु.१४६.६५ कोटी असे असा एकूण रु.११५६.६५ कोटी इतका निधी प्राप्त झाला असून, जिल्हास्तरावरुन प्राप्त निधी मागणीनुसार रु.९५०.८३ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**करवीर (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पंचायत समितीसाठी नवीन इमारत बांधण्याबाबत**

**(३१) ६८१०३ (०५-०१-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करवीर (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पंचायत समितीमध्ये एकूण २२ सदस्य असून जिल्हयामध्ये सर्वात मोठी पंचायत समिती असून सदर पंचायत समितीचे कामकाज सध्या शहरातील एका भाडयाच्या इमारतीमध्ये चालते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पंचायत समितीसाठी नवीन इमारत शासनाकडून मंजूर होणेकरिता पंचायत समिती, करवीर व जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी वेळोवेळी ठराव केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पंचायत समितीसाठी नवीन इमारत मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०४-२०१७) :**(१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) करवीर पंचायत समिती नवीन इमारत बांधकामासाठी जागा उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही जिल्हा परिषदेकडून सुरु आहे. परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा परिषदेकडून प्रतिक्षाधीन आहे.

---

**राज्यातील ग्रामिण भागातील १ हजार गावांचा सर्वांगिण विकास करण्याबाबत**

**(३२) ७०६१४ (०५-०१-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामिण भागातील १ हजार गावांचा सर्वांगिण विकास करणार असल्याचे मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक २६ ऑगष्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास घोषणा केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण भागातील गावांचा विकास करण्यासाठी राज्यातील कोणत्या गावांचा समावेश करण्यात आला आहे,
(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-०४-२०१७) :**(१) होय.
(२) गावे निवडीची कार्यवाही सुरु आहे.
(३) मिशनची जिल्हा व क्षेत्रीय स्तरावर प्रभावी व कार्यक्षमतेने अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा अभियान परिषदेची दिनांक २९/१२/२०१६ च्या शासन निर्णयान्वये स्थापना करण्यात आलेली आहे.

कंपनी अधिनियमाच्या कलम-८ अन्वये कंपनी स्थापन करण्यात आली आहे.

या अभियानाच्या अंमलबजावणीकरीता सदर कंपनीअंतर्गत Governing Council गठीत करण्यात आली असून या Council च्या बैठका व कामकाज सुरु झाले आहे.

मिशनअंतर्गत विविध कार्यगट तयार करण्यात आले आहेत.

मिशनअंतर्गत संनियंत्रण व्यवस्था टाटा ट्रस्ट व रिलायन्स फाऊंडेशन यांच्याकडून तयार करण्यात येत आहे.

मिशनच्या Rural development Fellowship Programme अंतर्गत पहिल्या टप्प्यासाठी निवड झालेल्या Fellows चे प्रशिक्षण आयोजित केले जाणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इतर प्रवर्गातील शेतकऱ्यांकरिता अल्पभूधारक अट रद्द करण्याबाबत

**(३३) ७०६९३ (०९-०१-२०१७). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मनरेगातंर्गत शेतकऱ्यांना शेत तलाव, सिंचन विहीर, जनावरांचा गोटा, कांपोस्ट खत खड्डा, शेळीचा गोटा, गांडूळ खत, इत्यादी योजना राबविल्या जातात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनांचा लाभ केवळ अनूसुचित जाती-जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांनाच मोठ्या प्रमाणावर दिला जातो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इतर प्रवर्गातील शेतकऱ्यांना अल्पभूधारक ही अट ठेऊन सदर योजनेचा लाभ दिला जात आहे परंतु विदर्भात इतर प्रवर्गातील ज्यादातर शेतकरी हे अल्पभूधारक नसल्याने ते या योजनांपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, इतर प्रवर्गातील शेतकऱ्यांकरिता अल्पभूधारक अट रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१९-०४-२०१७)** :(१) मनरेगा योजनेंतर्गत काम करण्यासाठी ज्या व्यक्तीची मजूर म्हणून नोंद करण्यात आलेली आहे त्याच मजूराला केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार काम देण्यात येते.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वामध्ये अल्पभूधारकांना काम देण्याची अट असल्याने त्यात कोणताही बदल करता येणार नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांच्या इमारतीची झालेली दुरवस्था**

**(३४) ७२०६६ (१६-१२-२०१६). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यात विद्यार्थ्यांना ज्ञानगंगा पुरविणाऱ्या जिल्हा परिषद शाळांचा मुख्य असलेल्या मुख्याध्यापकांची एकूण २५ पदे रिक्त असल्याची बाब माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेनगाव तालुक्यात अनेक शाळांच्या इमारती जीर्ण झाल्या असून अनेक शाळांना संरक्षक भिंत बांधण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषदेतील मुख्याध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत व शाळांच्या इमारतीच्या दुरुस्तीसह संरक्षण भिंत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०४-२०१७)** :(१) सेनगाव तालुक्यांतर्गत जिल्हा परिषदेच्या १६८ शाळा आहेत.त्यापैकी उच्च श्रेणी मुख्याध्यापकांची १४ पदे रिक्त आहेत.

(२) अंशत: खरे आहे.सेनगाव तालुक्यांतर्गत जिल्हा परिषदेच्या १६८ शाळा असून U-Dise Data२०१५-१६ नुसार ३२ शाळांना कोणत्याही प्रकारची संरक्षण भिंत नाही व ५२ शाळांना शाळा खोली दुरुस्तीची आवश्यकता आहे.

(३) व (४) सेनगाव तालुक्यातील मुख्याध्यापकांची बिंदु नामावली मान्यतेकरीता सादर करण्यात आली आहे. बिंदुनामावली मान्य होताच पदोन्नतीने रिक्त पदे भरण्यात येतील.

सेनगाव तालुक्यांतर्गत १९ शाळांना शाळा दुरुस्ती व १ शाळेस संरक्षण भिंत मंजूर करण्यात आलेली आहे.

---

**यवतमाळ जिल्हयातील उमरखेड महागांव पंचायत समिती इमारत बांधकामाच्या प्रस्तावास मंजुरीसह निधी देण्याबाबत**

**(३५) ७२०८४ (१६-१२-२०१६). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील उमरखेड महागांव पंचायत समिती इमारत बांधकामाच्या प्रस्तावास मंजुरी देवून निधी उपलब्ध करून देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.ग्रामविकास मंत्री यांना माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०४-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) जिल्हा परिषदेकडून महागाव पंचायत समिती प्रशासकीय इमारत बांधकामाचा प्रस्ताव दि.२९.०८.२०१६ रोजी प्राप्त झाला असून सदर प्रस्तावात आढळून आलेल्या त्रुटी दि.३१.०८.२०१६ रोजी जिल्हा परिषदेला कळविण्यात आलेल्या आहेत. सदर त्रुटीची पुर्तता जिल्हा परिषदेकडून अद्याप करण्यात आलेली नाही.

उमरखेड पंचायत समिती प्रशासकीय इमारत बांधकामाचा सविस्तर व परिपुर्ण प्रस्ताव शासनास सादर करण्याची कार्यवाही जिल्हा परिषदेकडून प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कारंजा (जि.वर्धा) तालुक्यातील कार नदी प्रकल्पास निधी देण्याबाबत**

**(३६) ७२७८५ (२७-०१-२०१७). श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कारंजा (जि.वर्धा) तालुक्यातील कार नदी प्रकल्पास पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात आले नसल्यामूळे या प्रकल्पाची सर्व कामे बंद झाली असल्याची माहिती दिनांक ४ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन १९८७ मध्ये कामास सुरुवात झालेल्या या प्रकल्पाच्या धरणाचे काम सन २००० मध्ये पुर्ण झाले परंतु लोहारी सावंगी वितरिकेवरील कि.मी ७ व ८ मधील १.५० कि.मी लांबीच्या जलसेतूच्या कामाकरीता अद्यापही निधी उपलब्ध झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पाचे काम पुर्ण होण्याकरिता पर्याप्त निधी उपलब्ध करुन देण्याबाबत व या प्रकल्पातील भुसंपादनाची प्रकरणे निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०४-२०१७) :**(१) व (२) नाही.

सदर प्रकल्प पूर्ण करण्यास रु.१५१.१३ कोटीची आवश्यकता आहे. सन २०१६-१७ मध्ये रु.४.०० कोटी निधीची तरतुद करण्यात आली होती. सदरचा निधी भुसंपादन प्रक्रियेवर खर्च करण्यात आलेला आहे. तसेच शासनाच्या दिनांक ३०/०१/२०१७ च्या आदेशान्वये या प्रकल्पांस अधिकचा रु.६.०० कोटी इतका निधी पुनर्विनियोजनाने उपलब्ध करुन दिलेला आहे.

(३) शासनाच्या दिनांक ३०/०१/२०१७ च्या आदेशान्वये कार प्रकल्पास अधिकचा रु.६.०० कोटी इतका निधी पुनर्विनियोजनाने उपलब्ध करुन दिलेला आहे.

सरळ खरेदीद्वारे भूसंपादन करण्याची कार्यवाही प्राधान्याने सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील दुष्काळी तालुक्यांत जुनी रोजगार हमी योजना पूर्ववत सुरु करण्याबाबत**

**(३७) ७३६८६ (०९-०१-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळी तालुक्यांत एम.आर.ई.जी.एस. ऐवजी जुनी रोजगार हमी योजना सुरु करून मजुरांना तात्काळ कामे उपलब्ध करून देण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने राज्यातील दुष्काळी तालुक्यांत जुनी रोजगार हमी योजना सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१४-०६-२०१७) :**(१) राज्यातील दुष्काळी तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ऐवजी जुनी रोजगार हमी योजना सुरु करण्याबाबतची मागणी मा. लोकप्रतिनिधींनी केल्याचे दिसून येत नाही. अशा प्रकारचे निवेदन आढळून येत नाही.

(२) व (३) सध्या राज्यामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र ही योजना केंद्र शासनाच्या कायद्याप्रमाणे व मार्गदर्शक सूचने प्रमाणे सुरु आहे. सदर योजनेअंतर्गत संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मागणीप्रमाणे मजुरांना काम उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यामुळे जुनी रोजगार हमी योजना सुरु करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर जिल्हयात महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतंर्गत काम करणाऱ्या मजुरांना मजुरी मिळण्याबाबत**

**(३८) ७४१३५ (१५-०४-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयात महात्मा गांधी रोजगार हमी योजनेवर काम करणाऱ्या ६६१ मजुरांची मजुरी त्यांच्याकडे आधार कार्ड नसल्याचे कारण दाखवून थांबविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार मजुरी देताना येणाऱ्या त्रुटी दूर करुन मजुरांना मजुरी देण्याबाबत व मजुरांना मजुरी देण्यास दिरंगाई करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१३-०६-२०१७)** :(१) हे खरे नाही.

लातूर जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेवर काम करणाऱ्या ६६१ मजूरांची मजूरी त्यांच्याकडे आधार कार्ड नसल्याचे कारण दाखवून थांबविण्यात आलेली नाही. या योजनेंतर्गत लातूर जिल्ह्यात काम करणाऱ्या Active मजूरांची एकूण संख्या १,१९,९१३ इतकी आहे. त्यापैकी MIS वर आधार क्रमांकांची नोंद झालेल्या एकूण Active मजूरांची संख्या १,१९,०७३ लक्ष (टक्केवारी- ९९.०३% इतकी आहे).

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## काळम्मावाडी (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) येथील दुधगंगा धरणावरील उपविभागीय कार्यालय स्थलांतरीत केल्याबाबत

**(३९) ७४७२८ (१५-०४-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काळम्मावाडी (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) येथील दुधगंगा धरणावरील उपविभागीय कार्यालय दिनांक १ डिसेंबर, २०१६ रोजीपासून बंद करुन तिटवे या ठिकाणी धरणापासून २० कि.मी अंतरावर स्थलांतरीत करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपविभागीय कार्यालय स्थलांतरीत करण्याची कारणे काय आहेत

(३) असल्यास, या स्थलांतरामुळे धरणाच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे,

(४) असल्यास, या धरणाच्या सुरक्षेसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१७-०५-२०१७)** :(१) होय.

(२) उपविभागाकडील कार्यभाराचा आढावा घेऊन जादा आस्थापना कमी करुन आस्थापनेवरील खर्च कमी करण्याच्या दृष्टीने दुधगंगा डावा कालावा उपविभाग क्र.१, दुधगंगानगर हा उपविभाग बंद करण्यात आला आहे.

(३) व (४) धरण सुरक्षिततेसाठी प्रकल्पस्थळी यंत्रणा कार्यरत असून, उपविभाग कार्यालय बंद केल्यामुळे धरण सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झालेला नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कृष्णा, गोदावरी, विदर्भ, तापी व कोकण अशा पाचही महामंडळातील कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाहाची रक्कम त्यांच्या खात्यात भरण्यात आली नसल्याबाबत

**(४०) ७५११४ (२०-०४-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या जलसंपदा खात्याच्या कृष्णा, गोदावरी, विदर्भ, तापी व कोकण अशा पाचही महामंडळातील कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाहाची रक्कम शासनाकडून कर्मचा-यांच्या खात्यात भरण्यात आली नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर कर्मचाऱ्यांच्या खात्यात भविष्य निर्वाहाची रक्कम भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१८-०५-२०१७)** :(१) नाही.

जलसंपदा विभागातील पाच महामंडळांतर्गत ज्या कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी क्रमांक प्राप्त झाला आहे त्यांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम दरमहा पगारातुन कपात करुन नियमित कर्मचा-यांच्या खात्यात भरण्यात येते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोली जिल्हयात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गतची सहा हजार कामे अपूर्ण असल्याबाबत

**(४१) ७७५१८ (१५-०४-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत पूर्ण कामांची टक्केवारी केवळ ५६ टक्केच असून आता अपूर्ण असलेली सुमारे सहा हजार कामे अपूर्ण असल्याचे माहे जानेवारी,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अपूर्ण कामांमुळे रोजगाराअभावी मजूरांचे स्थलांतर होऊ लागले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन रोजगाराअभावी होणारे मजूरांचे स्थलांतर थांबविण्याबाबत व सदर अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१३-०६-२०१७)** :(१) होय.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकूण १४५०५ इतकी कामे हाती घेण्यात आली असून ८०५८ कामे पूर्ण तर ६४४८ इतकी कामे अपूर्ण आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही काम मागणीवर आधारित योजना असल्याने कामाची मागणी प्राप्त होताच मजूरांना कामे उपलब्ध करुन देण्यात येतात. सदर प्रकरणी मजूरांची कामाची मागणी प्राप्त होताच प्राधान्याने अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार कामाची मागणी प्राप्त होताच मजूरांना कामे उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. त्यामुळे रोजगाराअभावी मजूरांचे स्थलांतर झालेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणेच्या कोल्हापूर पाटबंधारे मंडळ अंतर्गत असलेल्या विभागीय कार्यालयाची पाच उपविभागीय कार्यालये बंद करण्याच्या निर्णयाबाबत**

**(४२) ७७९२० (१७-०४-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणेच्या कोल्हापूर पाटबंधारे मंडळ अंतर्गत दूधगंगा कालवे विभाग १ कोल्हापूर (बांधकाम) व वारणा कालवे विभाग १, इस्लामपूर (बांधकाम) या दोन विभागीय कार्यालयाची पाच उपविभागीय कार्यालये बंद करण्याचा निर्णय माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान जलसंपदा विभागाने घेतला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा निर्णय घेण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या कार्यालयाचा कार्यभार कोणाकडे वर्ग करण्यात येणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन (१७-०५-२०१७) :**(१) होय.

(२) उपविभागाकडील कार्यभाराच्या आढाव्यानुसार जादा आस्थापना कमी करुन आस्थापनेवरील खर्च कमी करण्यासाठी निर्णय घेण्यात आला.

(३) बंद करण्यात आलेल्या उपविभागाचा कार्यभार त्याच विभागाधिनस्त अन्य उपविभागांतर्गत वर्ग करण्यात आला आहे.

---

**धारणी (जि.अमरावती) तालुक्यात म.ग्रा.रो.ह. योजने अंतर्गत कुशल कामांचे बनावट करारनामे करुन केलेला गैरव्यवहार**

**(४३) ७९१४८ (१९-०४-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारणी (जि.अमरावती) तालुक्यात म.ग्रा.रो.ह. योजने अंतर्गत कुशल कामांचे बनावट करारनामे करुन कंत्राटदार व संबंधीत कनिष्ट अभियंत्यानी संगनमताने देयके घेतल्याची दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धारणी तालुक्यातील मोगरा ते गावतलाव जोडरस्ता, तातरा ते गावतलाव जोडरस्ता, झील्पी ते नंदकिशोर मुंशी शेतापर्यंत रस्ता, खापरखेडा ते चौखंड्या (मध्यप्रदेश) सिमेपर्यंत रस्ता या कामांचे बनावट करारनामे आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीनुसार गैरव्यवहार करणाऱ्या कंत्राटदार व संबंधीत कनिष्ट अभियंत्यावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१२-०६-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### हिंगोली जिल्हयात जॉबकार्डाची तपासणीचे काम अतिशय संथ गतीने सुरु असल्याबाबत

**(४४) ८०१०४ (१९-०४-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हयात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत विविध प्रकारची कामे घेण्यात येतात मात्र जॉबकार्डाची तपासणीचे काम अतिशय संथ गतीने सुरु असल्यामुळे केवळ दोनच टक्के जॉबकार्डाची तपासणी करण्यात आल्यामुळे पुढील काळात मजूरांना काम मिळणे कठीण होणार असल्याने ग्रामीण भागातील मजूरांवर उपासमारीची वेळ येणार असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार जॉबकार्डच्या तपासणीचे काम जलद गतीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१३-०६-२०१७) :**(१), (२) व (३) नाही.
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत प्रत्येक जॉबकार्डधारकास मागणीनुसार काम उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. या योजनेमध्ये केवळ पारदर्शकता आणण्यासाठी व सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी जॉबकार्ड पडताळणी व अद्यावतीकरण करण्याच्या सूचना शासनाने क्षेत्रिय स्तरावर दिलेल्या आहेत. सद्य:स्थितीत हिंगोली जिल्हयामध्ये जॉबकार्ड तपासणीचे काम ४१.५५% पूर्ण झाले असून उर्वरित जॉबकार्ड पडताळणीचे काम प्रगतीपथावर आहे. जॉबकार्ड पडताळणी प्रक्रिया शीघ्र गतीने पूर्ण करण्यासाठी शासन स्तरावरुन पाठपुरावा करण्यात येत आहे. तरी मजूराकडून मागणी प्राप्त होताच नियमानुसार मजूरांना कामे उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. त्यामुळे मजूरांवर उपासमारीचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धुळे येथील शेतकऱ्यांचे कांदे विक्रीचे धनादेश त्यांच्या बँक खात्यात विलंबाने जमा होत असल्याबाबत**

**(४५) ८०५४८ (०६-०५-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे येथील शेतकऱ्यांने कांदे विक्रीचा धनादेश येवला येथील बँक ऑफ बडोदा शाखेत त्याच्या बचत खात्यात टाकूनही त्याचे पैसे एक महिन्यापर्यंत खात्यावर जमा करण्यात आले नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार बँक खात्यावर पैसे जमा करण्यास विलंब करणाऱ्या अधिकारी,कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०६-२०१७) :**(१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत झालेल्या कामाचे अनुदान लाभार्थ्यांना देण्याबाबत**

**(४६) ८१००५ (२०-०४-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती, यवतमाळ येथे दिनांक २६ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास आयोजित करण्यात आलेल्या सभेत स्थानिक लोकप्रतिनिधी आर्णी जिल्हा यवतमाळ यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत झालेल्या कामाचे अनुदान लाभार्थ्यांना न मिळाल्याबाबत विचारणा केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने ७ दिवसात चौकशी करून अनुदानाचे वितरण करून तसा अहवाल मा.स्थानिक लोकप्रतिनिधी आर्णी जिल्हा यवतमाळ यांना देण्याचा आदेश संबंधितांना दिला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ७ दिवसाच्या आत लाभार्थ्यांना अनुदान देऊन तसा अहवाल मा.स्थानिक लोकप्रतिनिधी आर्णी जिल्हा यवतमाळ यांना उपलब्ध करून देण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत झालेल्या कामाचे अनुदान लाभार्थ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१२-०६-२०१७)** :(१) हे खरे नाही.

जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती सभेच्या इतिवृत्ताची पडताळणी केली असता, सदर सभेमध्ये मग्रारोहयो अंतर्गत लाभार्थ्यांना अनुदान न मिळाल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी विचारणा केल्याचे दिसून येत नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) मग्रारोहयो अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर घेण्यात आलेल्या कामावर मजुरांच्या मागणीप्रमाणे मजुरांना कामे उपलब्ध करुन दिली जातात व त्यानुसार त्यांनी केलेल्या कामाच्या मुल्यांकनानुसार त्यांची मजुरी थेट त्यांच्या खात्यात वर्ग करण्यात येते. तसेच शासन परिपत्रक दि.७.३.२०१५ व दि.७.९.२०१५ अन्वये निर्देशित केल्यानुसार कुशल साहित्याची खरेदी ग्रामपंचायत मार्फत करुन सदर साहित्य कामावर उपलब्ध करुन देऊन त्यानुसार कुशल साहित्याची देयके संबंधित पुरवठादारास अदा करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पन्नास हजारापेक्षा अधिकच्या रकमेची खरेदी करण्यास बंदी घालण्याचा वित्त विभागाने घेतलेला निर्णय**

**(४७) ८२८७५ (१९-०४-२०१७). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या कोणत्याही विभागाला पन्नास हजारापेक्षा अधिकच्या रकमेची खरेदी करण्यास वित्त विभागाच्या निर्णयाने बंदी घातल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयामुळे राज्यातील शासकीय वैद्यकीय रुग्णालयांमध्ये मोठ्याप्रमाणात औषधांचा तुटवडा निर्माण झाला असून या रुग्णालयांकडून औषधांची खुल्या बाजारातून वाढत्या दराने खरेदी सुरु करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-०६-२०१७)** :(१) होय, हे अशंत: खरे आहे. तथापि, गृह विभागाकडील उपलब्ध निधीच्या मर्यादेमध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी करावयाच्या खरेदीची यास अपवाद राहील. केंद्रिय योजना व त्यास अनुरूप राज्य हिस्सा तसेच बाहय सहायित प्रकल्पासाठी हे निर्बंध लागू राहणार नाहीत. सदर आदेश सर्व प्रशासकिय विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालये, शासकिय महामंडळे, अनुदानित संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी/ग्रामीण) इत्यादीबाबत शासनाने उपलब्ध करून दिलेल्या अर्थसंकल्पिय तरतुदीमधून करावयाच्या खरेदीकरता लागू राहील.

(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जलसंपदा विभागातील सर्व महामंडळात रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या पेन्शनबाबत**

**(४८) ८३६९६ (२०-०४-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागातील सर्व महामंडळात दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी नंतर रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना राज्य शासनाची नविन परिभाषीत अंशदायी निवृतीवेतन योजना (DCPS) लागू आहे व दिनांक ६ एप्रिल, २०१५ च्या वित्त विभागाच्या शासन निर्णयान्वये सदर योजना आता केंद्र शासनाच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत (NPS) समाविष्ट करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलसंपदा विभागातील हजारो कर्मचाऱ्यांची DCPS योजनेची वर्गणी त्यांच्या पगारातून कपात करण्यात आलेली असून शासन अंशदानासह त्यांच्या वैयक्तिक पेन्शन खात्यामध्ये जमा करण्यात आलेली नाही व त्यामुळे यांना आजपर्यंत त्या रक्कमेवर व्याज मिळू शकलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१२ नंतरच्या कर्मचाऱ्यांची या पेन्शन योजनेची खातीच अद्याप सुरु करण्यात आलेली नाहीत व याबाबत कर्मचारी वारंवार लेखी तक्रारी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१८-०५-२०१७) :**(१) होय.

हे खरे आहे.

(२) होय. जलसंपदा विभागातील पाच महामंडळांतर्गत नोव्हेंबर २००५ नंतर शासनाकडुन नियुक्त कर्मचाऱ्यांचा पगार सेवार्थ मधुन होत नसल्याने व सेवार्थ आय.डी. नसल्याने DCPS ची खाती संबंधीत कोषागार कार्यालयांकडे उघडु शकले नाही व त्यामुळे वर्गणी, कपात करुन नव्याने नियुक्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन खात्यात जमा करता आलेले नाही.

(३) होय. जलसंपदा विभागातील पाच महामंडळांतर्गत येणाऱ्या सर्व कार्यालयात सेवार्थ प्रणाली लागु नाही. त्यामुळे २०१२ नंतर कर्मचाऱ्यांनी खाती अद्याप सुरु झालेली नाहीत. त्यानुषंगाने काही कर्मचाऱ्यांनी क्षेत्रीय कार्यालयाकडे विनंती अर्ज केले आहेत.

(४) शासन पत्र दि.१८/०३/२०१७ अन्वये या प्रकरणी आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्याने खुल्या बाजारातून घेतलेल्या कर्जाबाबत

**(४९) ८३७७५ (१५-०४-२०१७). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याने आर्थिक बाजारातून घेतलेले कर्ज आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये अंदाजे २२% ने वाढून ४.५ ट्रिलियन रुपये इतके होणार असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने वाढलेल्या कर्जाबाबत त्याच्या परतफेडणीसाठी काही विशेष आर्थिक योजना केल्या आहेत काय,

(३) तसेच शासनाने वाढत चाललेले कर्ज कमी करण्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-०६-२०१७) :**(१) सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाअखेर सुधारित अंदाजानुसार राज्याचे एकुण दायित्व रू.३,७१,०४७ कोटी तसेच सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाअखेर अर्थसंकल्पीय अंदाजानुसार राज्याचे एकुण दायित्व रू.४,१३,०४४ कोटी एवढे अपेक्षित आहे.

राज्याच्या एकुण दायित्वात सन २०१७-१८ मध्ये अंदाजे ११.३२% वाढ अपेक्षित आहे. एकुण दायित्वामधील महाराष्ट्र राज्य विकास कर्ज (OMB ) सन २०१७-१८ मध्ये अंदाजे १६.७४% वाढ अपेक्षित आहे.

(२) व (३) वित्त विभागाने दिनांक ३१/०३/२०१७ पर्यंत होणाऱ्या अनावश्यक खरेदीवर निर्बंध लावून अनावश्यक खर्च कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच विभागाकडील अखर्चित निधी हा घाईघाईने वर्षाअखेरिस संपविण्याच्या वृत्तीवरती निर्बंध लावून आर्थिक शिस्त राखण्याचा प्रयत्न केला आहे.

अत्यावश्यक सेवा, डॉक्टर्स, पॅरामेडीकल स्टाफ, आर्थिकदृष्टया सक्षम स्वायत्त संस्था तसेच ज्या विभागांच्या पदनिर्मितीमुळे राज्याच्या महसूलात वाढ होणार आहे असे प्रस्ताव वगळता “वेतनावरील खर्च नियंत्रित करणे” या विषयाच्या वित्त विभागाच्या दिनांक ०२-०६-२०१५ च्या शासन निर्णयान्वये शासकीय कार्यालयातील नवीन पदनिर्मिती / पदभरती यावर निर्बंध घालण्यात आले आहेत.

राज्याच्या कर व करेतर महसूलाच्या माध्यमातून मिळणाऱ्या उत्पन्नात सातत्याने वाढ होण्यासाठी साधन संपत्ती, वित्त विभागाकडून वारंवार बैठकांचे आयोजन करून संबंधित प्रशासकीय विभागांना महसूल वाढीच्या उपाययोजनाची अंमलबजावणी करण्याबाबत सूचना देण्यात येतात, तसेच आढावा घेण्यात येतो.

(४) लागु नाही.

---

**रेणापूर (जि.लातूर) येथे दिवाबत्तीच्या कामास मंजूरी देण्याबाबत**

**(५०) ८४३४० (१९-०४-२०१७). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील नगर पंचायत रेणापूर येथे नागरिकांच्या सोयीसाठी रेणापूर फाटा ते श्रीराम विद्यालय रेणापूर पर्यंत रस्त्यावरील दुभाजकामध्ये दिवाबत्तीचे काम जिल्हा वार्षिक योजना नाविन्य पूर्ण योजनेंतर्गत निधीतून मंजूर करण्याबाबतची मागणी लातूर ग्रामीण येथील स्थानिक लोकप्रतिनिधिनी यांनी मा.पालकमंत्री, लातूर व जिल्हाधिकारी, लातूर यांना दिनांक ३० डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामास मंजुरीसाठी किती निधीची आवश्यकता असून सदर कामास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-०६-२०१७) :**(१) जिल्हा नियोजन अधिकारी, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीनुसार लातूर (ग्रामीण) मतदार संघाचे विधानसभा सदस्य यांनी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१६-१७ मध्ये नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत नगर पंचायत, रेणापूर येथे रेणापूर फाटा ते श्रीराम विद्यालयाच्या रस्त्यावरील दुभाजकामध्ये दिवाबत्तीचे काम मंजूर करण्याबाबत जिल्हाधिकारी यांना दि.१९/११/२०१६ रोजी निवेदन दिले होते.

(२) व (३) जिल्हा नियोजन अधिकारी, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीनुसार स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने मुख्याधिकारी नगरपंचायत, रेणापूर यांनी रु.९०.०० लक्ष अंदाजित किंमतीचा प्रस्ताव सादर केला. सदर प्रस्तावास त्रुटी होत्या. सदर त्रुटींची पूर्तता करुन कर्यान्वयीन यंत्रणेकडून विहित मुदतीत प्रस्ताव सादर न झाल्याने व सन २०१६-१७ मध्ये नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत कामांकरीता राखीव असलेल्या निधीतून इतर कामे मंजूर करण्यात आल्याने सदर प्रस्तावास मंजूरी देण्यात आली नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.